| | |
|---|---|
| | **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्र. ३२०/२०१३ मधील</u>**<br>**<u>अर्ज निशाणी क्रमांक १९ खालील आदेश</u>**<br><u>( **CNR- MHWS**050001742012)</u> |

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी, साक्षीदार क्र. २ सल्लागार अभियंता व मुल्यांकनकर्ता यांच्या मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने साक्षीदार क्र. २ यांच्या शैक्षणिक पात्रतेची ३ प्रमाणपत्रे, approved valuer certificate, अनुभव प्रमाणपत्र यांच्या प्रमाणित प्रती आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०६/१२/२००७ रोजीचे परिपत्रकाची छायांकीत प्रत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास गैरअर्जदार क्र.२ यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. अर्जदार यांचेतर्फे विधीज्ञ श्री पी. एम भगत यांचा आणि गैरअर्जदार क्र. २ यांच्या तर्फे विधीज्ञ श्री व्ही. टी. आकोटकर यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार दाखल करु इच्छित असलेल्या साक्षीदार क्र. २ सल्लागार अभियंता व मुल्यांकनकर्ता यांच्या मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने साक्षीदार क्र. २ यांच्या शैक्षणिक पात्रतेची ३ प्रमाणपत्रे, approved valuer certificate, अनुभव प्रमाणपत्र यांच्या प्रमाणित प्रती आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०६/१२/२००७ रोजीचे परिपत्रकाची छायांकीत प्रत अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | ..अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**<u>मुद्दा क्र. ०१ बाबत</u> :-**

३. अर्जदार यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा रेफरंन्स

अर्जदाराने भुमीसंपादन अधिनियम,१८९४ चे कलम १८ अन्वये दाखल असून प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत आहे. अर्जदार हे साक्षीदार क्र. २ सल्लागार अभियंता व मुल्यांकनकर्ता यांच्या मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने साक्षीदार क्र. २ यांच्या शैक्षणिक पात्रतेची ३ प्रमाणपत्रे, approved valuer certificate, अनुभव प्रमाणपत्र यांच्या प्रमाणित प्रती आणि महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ०६/१२/२००७ रोजीचे परिपत्रकाची छायांकीत प्रत दाखल करीत आहे. तरी, त्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट गैरअर्जदार क्र. २ यांच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, संबंधीत कागदपत्रे दाखल करण्यास अर्जदाराने खूप विलंब केलेला आहे. तरी, अर्जदाराचा प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुतचा रेफरंन्स हा अर्जदाराच्या पुराव्याकरीता प्रलंबीत असून, अर्जदार हे साक्षीदार क्र. २ सल्लागार अभियंता व मुल्यांकनकर्ता यांच्या मुल्यांकन अहवालाच्या अनुषंगाने उपरोक्त कागदपत्रे दाखल करु इच्छीत आहे व त्या प्रती प्रस्तुतचा रेफरंन्स गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे त्या प्रती अभिलेखावर घेण्यास पात्र आहेत आणि अर्जदार यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. तसेच गैरअर्जदार यांना त्या प्रमाणित प्रतीच्या अनुषंगाने साक्षीदार क्र. २ यांचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.१९ हा मंजुर करण्यात येत आहे आणि अर्जदार यांना उपरोक्त दस्तऐवज दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2026.02.16 17:13:20 +0530

स्थळ : मंगरुळपीर
दिनांक :१६.२.२०२६.

( ध. भ. हंबीरे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
मंगरुळपीर.

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file order are same word to word, as per original Order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- C.R.Gadge |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Mangrulpir. |
| 3) | Date | :- 16.2.2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 16.2.2026 |
| 5) | Order uploaded on | :- 16.2.2026 |